## टिपणी

### आरोग्य विभागांतर्गत गणेशोत्सव २०२६ साठी उपलब्ध करून द्यावयाच्या वैद्यकीय सेवा

- श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्ट, बुधवार पेठ या ठिकाणी दि. १४/०९/२०२६ ते दि. २५/०९/२०२६ या गणेशोत्सवाचे कालावधीत, गणेश दर्शनाकरिता येणाऱ्या भाविकांना आरोग्य शिबिराचे माध्यमातून अत्यावश्यक आणि तातडीची वैद्यकीय सेवा देणेप्रती, ०३ बेडचे आय. सी. यु. उपलब्ध करून देण्यात येणार आहे.
- सदर शिबिरासाठी पुणे महानगरपालिका आरोग्य विभागामार्फत ०१ भूलतज्ञ, ०३ वैद्यकीय अधिकारी, ०४ नर्स आणि ०१ अटेंडंट यांची २४ x ७, तीन पाळ्यांमध्ये (सकाळ, दुपार, रात्र) नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच संबंधित शिबिरासाठी आवश्यक औषधसाठा देखील पुरविण्यात येणार आहे.
- शुक्रवार दिनांक २५/०९/२०२६ रोजी अनंत चतुर्दशी असून गणपती विसर्जन मिरवणुका संपन्न होणार आहेत. शुक्रवार दिनांक २५/०९/२०२६ आणि शनिवार दिनांक २६/०९/२०२६ रोजी विसर्जन मिरवणूक संपे पर्यंत शहरातील खाली नमूद दोन ठिकाणी रुग्णवाहिका उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. रुग्णवाहिकेसोबत ०१ वैद्यकीय अधिकारी, ०१ औषध निर्माता, ०१ परिचारिका तसेच ०१ विविध कामे करणारे सेवक इतका कर्मचारी वृंद असणार आहे. सदर रुग्णवाहिकेमध्ये आवश्यक सामुग्री व औषधे उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

  1. डेक्कन जिमखाना, नटराज टॉकिज जवळ
  2. नूतन मराठी विद्यालय जवळ, लक्ष्मी रस्ता
  3. अलका टॉकीज चौक

- पुणे शहरातील १५ क्षेत्रिय कार्यालयाचे अंतर्गत येणाऱ्या कार्यक्षेत्रात, गणेश विसर्जनाचे दिवशी विविध गणेश विसर्जन घाटाचे ठिकाणी, वैद्यकीय पथक उपलब्ध करून देणेबाबत सर्व परिमंडळ वैद्यकीय अधिकारी (वर्ग-०१) व क्षेत्रिय वैद्यकीय अधिकारी यांना सूचित करण्यात आले असून त्यायोगे वैद्यकीय पथके उपलब्ध करून देण्यात आली आहेत.
- त्याचप्रमाणे १०८ रुग्णवाहिका यांच्यामार्फत १९ रुग्णवाहिका (०५ विसर्जन मिरवणूक मध्ये व ०५ इतर जास्त वर्दळीची ठिकाणे) उपलब्ध करून देण्याबाबत पत्र देण्यात आले आहे.
- तसेच, वैद्यकीय महाविद्यालय, इम्पॅक्ट गुरु फाउंडेशन व IHMP सोसायटी यांच्यामार्फत देखील रुग्णवाहिका उपलब्ध करून देण्याबाबत पत्र देण्यात आले आहे.
- दिनांक १०/०९/२०२६ रोजी म. अतिरिक्त आयुक्त यांनी श्री गणेशा आरोग्याचा अभियान २०२६ याबाबत आढावा बैठक घेतली, त्यामध्ये सर्व परिमंडळ वैद्यकीय अधिकारी (वर्ग-०१), क्षेत्रिय वैद्यकीय अधिकारी व वैद्यकीय अधिकारी यांना दि. १४/०९/२०२६ ते दि. २५/०९/२०२६ पर्यंत आरोग्य शिबीर घेण्याच्या सुचना दिलेल्या आहे.
- त्याचप्रमाणे पुणे मनपा अंतर्गत जे मोठे गणेश मंडळ व सर्वप्रकारचे दवाखाने असे एकूण २७५ ठिकाणी आरोग्य शिबीर घेण्याचे नियोजन आहे.
- श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्ट, बुधवार पेठ या ठिकाणी २०२५ च्या गणेशोत्सव मध्ये अंदाजे १५७ रुग्णांना आय.सी.यू.मध्ये उपचार देण्यात आले. तसेच, पुणे महानगरपालिकेच्या बाह्यरुग्ण विभाग व आंतररुग्ण विभागामार्फत गणेशोत्सव कालावधीत साधारणतः ३,००० ते ३,५०० रुग्णांना वैद्यकीय उपचार व सेवा देण्यात आल्या.
- तसेच गणेश चतुर्थी ते आजअखेरच्या कालावधीत अंदाजे ७००० ते ८००० रुग्णांना प्राथमिक वैद्यकीय उपचार व सेवा देण्यात आल्या आहेत.

(डॉ.निना बोराडे)
आरोग्य अधिकारी
पुणे महानगरपालिका